महाराष्ट्र पोलीस
नवी मुंबई

क्र.पोआ/नमुं/आस्था-६/पो.शि.भरती/लेखी परिक्षा/१५९ /२०२३
पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यालय,
दि. २९/३/२०२३
ईमेल :- establishmentbr-nm@mahapolice.gov.in

# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## पोलीस शिपाई भरती सन २०२१ च्या लेखी परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांना सुचना

१. नवी मुंबई घटकाच्या पोलीस शिपाई भरती सन २०२१ च्या लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ, ठिकाण, परिक्षा केंद्राच्या ठिकाणी उमेदवारांनी रिपोर्ट करण्याची वेळ इत्यादीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | लेखी परिक्षेचे केंद्राचे नांव व पत्ता | डी.वाय.पाटील स्टेडीयम, मुख्य प्रवेशव्दार, सेक्टर-७, नेरुळ, नवी मुंबई ४००० ७०६. |
| २ | लेखी परिक्षेची दिनांक व वेळ | दि.०२.०४.२०२३ रोजी सकाळी ०८.३० ते १०.०० |
| ३ | लेखी परिक्षा केंद्राच्या ठिकाणी उमेदवारांनी उपस्थित राहण्याची वेळ | दि.०२.०४.२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजता |

२. MahaIt च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेल्या प्रवेशपत्राची प्रत (Hall Ticket) उमेदवाराने सोबत आणणे अनिवार्य आहे.

३. परिक्षेच्यावेळी प्रवेश प्रमाणपत्राव्यतिरिक्त ओळखीच्या पुराव्यासाठी उमेदवाराने खालील पैकी किमान कोणतेही एक **मुळ ओळखपत्र** तसेच **ओळखपत्राची छयांकित प्रत** सादर करणे अनिवार्य आहे. (स्वत:चे मुळ आधार कार्ड / निवडणुक आयोगाचे ओळखपत्र / पॅनकार्ड / फक्त स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसंन्स / पारपत्र इत्यादी.)

४. उमेदवारांनी सोबत त्यांचे दोन पासपोर्ट साईझचे फोटो आणावेत.

५. प्रवेशपत्र, मुळ ओळखपत्र (छायांकित प्रतीसह) व पासपोर्ट साईझ फोटो सोबत न आणल्यास उमेदवारास परिक्षाकेंद्रात कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही.

६. उमेदवारास बॅग्ज, मोबाईल फोन, डीजीटल/इलेक्ट्रॉनिक्स दुरसंचार साधने इत्यादी प्रतिबंधित साधने परिक्षा केंद्रात आणण्यास मनाई आहे.

७. उशीरा आलेल्या उमेदवारास परिक्षाकेंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

८. परिक्षाकेंद्रात उमेदवारांना Writing Pad तसेच उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी काळा बॉलपेन पुरविण्यात येईल.

९. परिक्षाकेंद्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असल्याने उमेदवारांना पाण्याची बाटली परिक्षाकेंद्रात नेण्यास मनाई आहे.

१०. वाहन पार्किंगची व्यवस्था डी.वाय.पाटील स्टेडीयम लगत असलेल्या भिमाशंकर मैदानाच्या ठिकाणी करण्यात आली आहे.

(संजयकुमार पाटील)
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय
नवी मुंबई.

दिनांक :- २९.०३.२०२३

ठिकाण :- नवी मुंबई.

पोलीस आयुक्त
नवी मुंबई